**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक - ७२**

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.०३.३.२०२३ रोजी सकाळी ११.३० उपसमिती बैठक मा.श्री.विजय खोराटे, अति.आयुक्त-१ यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त-१ |
| २ | मा.श्री. संदिप कारंजे | अतिरिक्त आयुक्त-२ |
| ३ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ४ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ५ | मा.मच्छिंद्र घोलप | उपायुक्त -१ |
| ६ | मा.श्रीमती. विद्या पोळ | उपायुक्त- २/प्र.मुख्यलेखापाल |
| ७ | मा.श्रीमती. पुष्पगंधा भगत | सहा.आयुक्त |
| ८ | मा.श्री.विक्रमसिंह पाटील | सहा.आयुक्त/<br>प्र. परिवहन व्यवस्थापक |
| ९ | मा.श्री.बसवराज लोहारे | आरोग्याधिकारी |
| १० | मा.श्री लक्ष्मण चलवादी | प्र.नगरअभियंता |
| ११ | मा.श्री.निलकंठ मठपती | प्र.सार्व.आरोग्य अभियंता |

सदर बैठकीमध्ये मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी असा प्रश्न विचारला की, शासन निर्णयाप्रमाणे ५ टक्के समाज कल्याण, ५ टक्के महिला व बालकल्याणसाठी द्यावे लागतात त्या जी.आर. मध्ये बांधील खर्च वगळून ५ टक्के तरतुद करावी लागते. या बजेटमध्ये कशा पध्दतीने तरतुद केली आहे तसेच मागील अनुशेष बाबत काय तरतूद केली आहे? याची माहिती विचारणा केली त्यास मा.मुख्य लेखापाल यांनी असे उत्तर दिले की, एकूण महसुली उत्पन्न ५७१.८७ कोटी रु, एकूण बांधील खर्च ५३९.६७ कोटी रु. , बांधील खर्च वजा जाता शिल्लक रक्कम रु.३२.२० कोटी रु. व सदर रकमेच्या ५% महिला व बालकल्याणसाठी रु. १.६० कोटी, दिव्यांग सहाय्यता योजनेसाठी रु १.६० कोटी, मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी १.६० कोटी रु बजेटमध्ये तरतुद करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णयानुसार शिल्लक अनुशेष रक्कम देता येईल.

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | १४८ | सोलापूर महानगरपालिका सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे नियमित अंदाजपत्रक हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.स्थायी समितीकडे | उपायुक्त-२ (प्र.मुख्यलेखापाल) | प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका |

३.मा.वे. ७२
पान ९१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मंजुरीसाठी तद्नंतर मा.सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव शिफारस करणेकामी सादर करावयाचे आहे. परंतु मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२०/०२/२०२२ च्या मान्यतेने आलेले अंदाजपत्रकास मा.प्रशासक (मा.स्थायी समिती संदर्भ) ठराव क्र.१८९ दि.२३/०२/२०२३ च्या शिफारशीने आलेले प्रकरण. **(ऑफलाईन - मुख्यलेखापाल कार्यालय)** | | **अधिनियमचे कलम १०० अन्वये प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |
| २ | १४९ | सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०२२-२३ चे सुधारित व सन २०२३-२४ चे जमा व खर्चाचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९८ (१) (२) अन्वये मा.परिवहन समिती सो.म.पा. यांची मान्यतेअंती मा.स्थायी समितीच्या शिफारसीसह मा.सर्वसाधारण सभेपुढे परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक 'ब' सादर करणे कामी ठराव क्र.१२ दि.२३/०२/२०२३ (मा.परिवहन समिती संदर्भ) व ठराव क्र.१९० दि.२३/०२/२०२३ (मा.स्थायी समिती संदर्भ) च्या शिफारशीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०० अन्वये मा.सर्वसाधारण सभेची **मान्यता मिळणेस्तव** आलेले प्रकरण **(ऑफलाईन-परिवहन उपक्रम)** | सहा.आयुक्त (प्र.परिवहन व्यवस्थापक) | **प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०० अन्वये प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |

**मा.प्र.सार्व.आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका.**

**मा.प्र.नगर अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.आरोग्याधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.सहा.आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.सहा.आयुक्त तथा प्र.परिवहन व्यवस्थापक**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.उपायुक्त -१**
**सोलापूर महानगरपालिका.**

**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.उपायुक्त -२ तथा प्र.मुख्यलेखापाल**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.मुख्यलेखापरिक्षक**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.अति.आयुक्त-२**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.अति.आयुक्त -१**
**सोलापूर महानगरपालिका**

उ.म.ले. ४२
पान २/२

(२)

# सोलापूर महानगरपालिका

## प्रशासक ठराव

## विषय क्र.१४८ ठराव क्र.१४८ दिनांक.०३/०३/२०२३

## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१४८

सोलापूर महानगरपालिकेचे सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे नियमित अंदाजपत्रक हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी तद्नंतर मा.सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव शिफारस करणेकामी सादर करावयाचे आहे. परंतु मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे **मंजूरीस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२०/०२/२०२२ च्या मान्यतेने आलेले अंदाजपत्रकास मा.प्रशासक (मा.स्थायी समिती संदर्भ) ठराव क्र.१८९ दि.२३/०२/२०२३ च्या शिफारशीने आलेले **प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०० अन्वये प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

**(प्रविण प्रे.दतकाळे)**
**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

**(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**सोलापूर महानगरपालिका**

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.तात१/१४९ ठराव क्र.१४९ दिनांक.०३/०३/२०२३
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१४९

सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०२२-२३ चे सुधारित व सन २०२३-२४ चे जमा व खर्चाचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९८ (१) (२) अन्वये मा.परिवहन समिती सो.म.पा. यांची मान्यतेअंती मा.स्थायी समितीच्या शिफारसीसह मा.सर्वसाधारण सभेपुढे परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक **'ब'** सादर करणे कामी ठराव क्र.१२ दि.२३/०२/२०२३ (मा.परिवहन समिती संदर्भ) व ठराव क्र.१९० दि.२३/०२/२०२३ (मा.स्थायी समिती संदर्भ) च्या शिफारशीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०० अन्वये मा.सर्वसाधारण सभेची **मान्यता मिळणेस्तव** आलेले **प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १०० अन्वये प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका ★ मा.प्रशासक कार्यालय ★

(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका